# ‘त्यांनी’ मरणाला कवटाळताना दिले नऊ जणांना जीवदान

## ■ दोन दिवसांत नऊ यशस्वी शस्त्रक्रिया ■ चार यकृत, चार मूत्रपिंड व हृदयाचे प्रत्यारोपण

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबईत उपचारांदरम्यान मृत्यू झालेल्या चौघांनी या जगाचा निरोप घेण्यापूर्वी अवयवदान करून नऊ जणांचे प्राण वाचविले आहेत. मेंदू मृत झाल्यानंतर या चौघांच्या नातेवाईकांच्या परवानगीने चार यकृत, चार मूत्रपिंड व एक हृदय दान करण्यात आले. दोन दिवसात नऊ यशस्वी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करून बऱ्याच वर्षे अवयवांच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना जीवदान मिळाले आहे. वैद्यकीय क्षेत्राच्या इतिहासातील ही मोठी घटना असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. २०१६ या वर्षातील हे दहावे कॅडेव्हर डोनेशन (मृत व्यक्तीचे अवयव अन्य गरजू व्यक्तीला दान करणे) आहे.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या ३८ वर्षीय व्यक्तीला उपचारांसाठी वाशी येथील ‘एमजीएम’ रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच रुग्ण ‘ब्रेनडेड’ झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर अवयवदानाबाबत नातेवाईकांना



विचारणा केली असता त्यांनी परवानगी दिल्यावर हृदय, यकृत व दोन मूत्रपिंड दान करण्यात आली. यकृत ग्लोबल रुग्णालयातील एका ५० वर्षीय महिलेला देण्यात आले. एक मूत्रपिंड ‘एमजीएम’ रुग्णालयातील ३८ वर्षीय व्यक्तीला, तर दुसरे मूत्रपिंड नायर रुग्णालयातील २५ वर्षीय महिलेला दिले आहे. याशिवाय, ७८ वर्षीय वृद्धावर विक्रोळी येथील गोदरेज रुग्णालयात उपचार सुरू होते. वृद्धापकाळात मेंदूत अंतर्गत रक्तस्राव झाल्याने त्यांचा मेंदू मृत झाला होता. त्यांच्या मृत्यूची बातमी

| रुग्णालय | हृदय | यकृत | मूत्रपिंड |
|---|---|---|---|
| गोदरेज | - | १ | २ |
| एमजीएम | १ | १ | २ |
| नानावटी | - | २ | - |

नातेवाईकांना दिल्यानंतर डॉक्टरांनी त्यांच्याकडे अवयवदान करण्याची परवानगी मागितली. त्यानुसार यकृत आणि मूत्रपिंड यांच्या प्रतीक्षा यादीवर असलेल्या रुग्णांचे प्राण वाचू शकते, या उद्देशाने नातेवाईकांनीही अवयवदान करण्यास परवानगी दिली. त्यानुसार यकृत केडीए रुग्णालयातील ६६ वर्षीय महिलेला तर दोन्ही मूत्रपिंड गोदरेज रुग्णालयातील एका ६१ वर्षीय पुरुषाला देऊन त्यांचे प्राण वाचवणे शक्य झाले आहे.

९ फेब्रुवारीला रिक्षा अपघातात जखमी झालेल्या ८० व ५२ वर्षीय अशा दोन महिलांना नानावटी रुग्णालयात दाखल केले होते. मेंदूत रक्तस्राव झाल्याने उपचारांदरम्यान दोघांचाही मेंदू मृत झाला होता. ११ फेब्रुवारी रोजी डॉक्टरांनी त्यांना ‘ब्रेनडेड’ घोषित केले होते. त्यानंतर डॉक्टरांनी रुग्णाच्या नातेवाईकांना अवयवदान करण्यास परवानगी मागितली. नातेवाईकांनी अवयवदान करण्यास होकार दिल्यानंतर यकृत व मूत्रपिंड काढून घेण्यात आली. संबंधित रुग्णालयाच्या प्रत्यारोपण विभागीय समितीला याबाबत माहिती मिळाल्यानंतर यकृत ग्लोबल रुग्णालयातील ५८ वर्षीय पुरुषाला तर मूत्रपिंड फोर्टिस रुग्णालयातील ३९ वर्षीय पुरुषाला देण्यात आल्याची माहिती विभागीय प्रत्यारोपण विभागाचे समन्वयक प्रकाश सैंदाणे यांनी दिली.